# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office, Palghar**

Phone No. 02525-297032, Mob No.8669604078
Address: SP Office, Bidco Road, Palghar(W)
E-mail : propalghar@gmail.com


## प्रेसनोट दि.०६/०५/२०१८

## पोलीस वाहतुक शाखा,वसई यांचेकडुन जागतीक पर्यावरण दिनाचे आयोजन

दि.०५/०६/२०१८ रोजी सकाळी ०७.०० वा.जागतीक पर्यावरण दिनाचे औचित्य साधुन पोलीस वाहतुक शाखा वसई, दि इको-फ्रेंडली ग्रुप वसई व लायन्स क्लब यांचे संयुक्त विद्यमाने सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. सदर सायकल रॅली थॉमस चर्च एव्हरशाईन येथुन सुरु होवुन पंचवटी मार्गे बाबोळा व परत चुळणा मार्गे विशाल नगर माणिकपुर येथे संपली. मा.अपर पोलीस अधीक्षक सो,वसई श्री.राजतिलक रोशन यांनी सायकल रॅलीला संबोधीत केले. सायकल रॅलीच्या माध्यमातुन पर्यावरणाचे महत्त्व, प्लास्टीक प्रदुषण व प्रदुषणापासुन वसुंधरेच संरक्षण याबाबत जनजागृती करण्यात आली.

मा.अपर पोलीस अधीक्षक सो,वसई श्री.राजतिलक रोशन, उपविभागीय पोलीस अधिकारी सो,वसई श्री.दत्ता तोटावार, वाहतुक पोलीस निरीक्षक वसई श्री. संपतराव पाटील यांचे उपस्थितित सायकल रॅलीमध्ये स्थानिक पोलीस, वाहतुक पोलीस, शाळा कॉलेजचे विद्यार्थी, स्थानिक नागरीक व लायन्स क्लबचे सदस्य मिळुन १५० लोकांनी भाग घेतला.